**नि. फौ.ख.क्र. ३८३/२०२१**

सरकार....वि. किरण व इतर

**निशानी क्र.– ६०**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ यांची जबानी**

मी शपथेवर सांगतो की,

माझे नांव– संदीपान पांडूरंग गोळे

वय – ५५ वर्षे, धंदा – शेतमजुरी

रा. अगोती नं.१, ता. इंदापूर, जि. पुणे

**सरतपासणी सरकारी विधीज्ञ श्री. एम. डी. करे यांचे मार्फत**

१. फिर्यादी संगिता गोळे ही माझी पत्नी आहे. मी आरोपींना ओळखतो, ते माझे भावकीतील आहेत. घटना ही दिनांक २६/०३/२०२१ रोजी सायंकाळी ०९.३० वाजण्याच्या सुमारास माझ्या घरी घडली आहे. माझी पत्नी व आरोपी क्र.३ आशाबाई यांचे दुपारी भांडण झाले होते. त्यानंतर संध्याकाळी आरोपी क्र.१ किरण गोळे हा आमच्या घरी येवून माझ्या पत्नीस शिवीगाळ केली, त्यावेळी मी सुध्दा माझ्या घरीच होतो. त्याने माझ्या पत्नीला हाताने मारहाण केली व त्यानंतर लोखंडी रॉडने मारहाण केली. तसेच मला सुध्दा त्याने हाताने व रॉडने मारहाण केली. त्यानंतर आरोपी क्र.२ महादेव गोळे आला व मला म्हणाला की, ''तुला सोडणार नाही''. त्याने सुध्दा मला हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर माझी मुले घरी परत आले तेंव्हा आरोपी क्र.१ ने माझा मुलगा दिपक यास लोखंडी रॉडने मारण्याचा प्रयत्न केला असता त्याने सदरचा वार हुकविला व सदरचे रॉड अमोल याच्या हाताच्या पंज्यावर लागले. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला गेलो. पोलीसांनी आम्हांला उपचारासाठी पोलीस यादी दिली. त्यानंतर आम्ही दवाखान्यात उपचारासाठी ॲडमिट झालो. त्यानंतर माझ्या पत्नीने आरोपींच्या विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली. पोलीसांनी माझ्याकडे घटनेबाबत विचारपूस केली होती. आज रोजी आरोपी क्र.१ हा न्यायालयात हजर आहे. मी इतर आरोपींना पाहिल्यास ओळखू शकतो. (अर्ज निशाणी क्र.५८ वरील आदेशान्वये आरोपी क्र.२ ते ४ ची हजेरीमाफ करण्यात आली आहे.)

२. घटनेत आरोपी किरण गोळे याने वापरलेले लोखंडी पाईप दाखविल्यास ते मी ओळखू शकतो. आता मला **MO क्र.१** वरील एक लोखंडी पाईप दाखविण्यात आला ते तेच आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलट तपास आरोपीं करीता विधीज्ञ श्रीमती एम. एल. आदलिंग यांच्या मार्फत–</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ महादेव हा माझा सख्खा भाऊ असून आरोपी क्र.१ पुतण्या, आरोपी क्र.३ भावजय व आरोपी क्र.४ ही सुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीं व आमच्यात वाटपाबाबत वाद चालू आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपी क्र.२ व चांगदेव यांच्या विरुध्द इंदापूर न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र.१९४/२०२१ हा वाटपासाठी दाखल केला असून तो प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीं व आमच्यात एक सामाईक जिना आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जिना वापरण्याच्या कारणावरुन आरोपीं व आमच्या वाद होत असतात. हे म्हणणे खरे आहे की, दुपारी माझी पत्नी व आरोपी क्र.३ यांच्यात काय वाद झाला होता याबाबत मला माहित नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी मी माझ्या घरामध्ये होतो. पोलीसांनी माझा घटनेबाबत जबाब घेतला नाही. मला घटनेबाबत झालेल्या मारहाणीबाबत मी दवाखान्यात उपचार केले होते. मी सरकारी दवाखान्यात उपचार घेतले. माझेवर उपचार करणा–या डॉक्टरचे नांव आता मला सांगता येणार नाही. माझेवर उपचार झालेबाबतची कागदपत्रे मी पोलीसांना दिले होते. मी घटनेच्या दिवशी रात्री ०२ ते ०३ तास दवाखान्यात ॲडमिट होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात माझा जबाब वाचून पाठ केल्यानंतर दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझा मुलगा व पत्नी असे आम्ही तिघेजणांनी पोलीस स्टेशनला जावून फिर्याद दिली होती. एम.ओ.१ वरील लोखंडी रॉड हा माझ्या पत्नीने पोलीसांना दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २६/०३/२०२१ रोजी कोणतीच घटना घडली नाही केवळ शेतीच्या

वाटपाच्या वादावरुन आरोपींच्या विरुध्द माझ्या पत्नीने खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतेही वैद्यकीय उपचार घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सांगितलेला संपुर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी फिर्यादीच्या सांगणेवरुन न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास – काहीही नाही.**

| | | |
|---|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | | समक्ष, |
| Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI Date: 2026.04.02 17:36:44 +0530 | | Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI Date: 2026.04.02 17:36:47 +0530 |
| न्यायदंडाधीकारी प्र.श्रे.इंदापूर | | (एम.एच. फारुकी) |
| दिनांक – ०१/०४/२०२६ | | न्यायदंडाधीकारी प्र.श्रे. इंदापूर. |